# <u>३८ . तरी बरं ( Thank God )</u>

आपलं आयुष्य म्हणजे एक प्रवासच . अगदी जन्मापासून मृत्यूपर्यंत . हल्लीच्या दिवसात सगळेच प्रवास ( रोजचा सुद्धा ) धकाधकीचे झाले आहेत .

आजच्या यंत्रयुगात कोणाला कोणासाठी थांबायला वेळ नाही . कायमची हातघाईची लढाई . वेळ तर मुळीच नाही . जंगलचा कायद्याच जणू . Survival the fittest . या सगळया धकाधकीत माणसाचा जीव मेटाकुटीला येतो . ज्यांना जन्मापासून गरिबीचा , कौटुंबिक परिस्थितीचा , आजारपणाचा सामना करावा लागतो त्यांच्या मनःस्थितीचा अंदाज करणे तर खूपच कठीण . ह्या सर्व पाऊलवाटेवरून मी चाललो असल्यामुळे जीवनाच्या उत्तरार्धात मी असा निष्कर्ष काढला की जीवनात ९० % समस्या ह्या किरकोळ व प्रासंगिक असतात . त्या आपोआप सुटतही असतात . पण ह्या युगातील धकाधकीमुळे त्या उग्र आहेत असा आपल्याला भास होतो व आपला धीर खचतो . ब-याच समस्या ह्या बेसुमार लोकसंख्या वाढ , गरिबी , अशिक्षितता त्यातून निर्माण होतात . ब-याच समस्या आपणही निर्माण करत असतो आपल्या हव्यासापायी . शेवटी प्रत्येक सुखाबरोबर एकतरी दुःख येतेच . त्यामुळे माझी अशी धारणा आहे की जर आयुष्यातील दुःख कमी करायचे असेल तर अनावश्यक सुखाला नकार देता आला पाहिजे . पहा विचार करून . एक उदाहरणच देतो . आपल्याकडे गाडी असते . आपण हौसेने गाडी घेऊन खरेदीला / हॉटेल मध्ये जातो . पण शहरात पार्कींगच मिळत नाही . मग गाडी कोठेतरी लांब उभी करायची व आपले काम करायचे . परत गाडीला काही होणार नाही ना ही भीती असतेच .

आज मी तुम्हाला रोजच्या समस्यांकडे वेगळया दृष्टीने बघायला लावणार आहे . ही दृष्टी जर का तुम्ही आत्मसात केलीन तर रोजच्या प्रापंचिक समस्यांपासून बिघडणारी मनःस्थिती आपण सावरू शकतो .

आपण समस्या आल्यानंतर त्या समस्येची जमेची बाजू विचारात घेतली तर समस्येची धार आपोआपच बोथट होते . तुमची उत्सुकता मी जास्त ताणत नाही . आपण रोजच्या समस्यांकडेच वळूया . आपण समस्या हल्क्या करण्यासाठी २ शब्दांचा उपयोग करणार आहोत . ‘ तरी बरं’ किंवा ‘**Thank God**’ म्हणजेच प्रत्येक समस्येतील सकारात्मक बाजू शोधणे .

१ . आज पण गाडी लेट ( उशीरा ) आहे .
<u>तरी बरं</u> गाडी रूळावरच आहे .
कोठे लहान सहान अपघात झाला असता , सिग्नल काम करत नसले तर ऑफीसला रजाच झाली असती .

२ . आज गाडी मध्ये बसायला मिळाले नाही .
<u>तरी बरं</u> व्यवस्थित उभे राहायला जागा मिळाली . गाडी चुकली नाही . उशीरही झाला नाही .

३ . आज रिक्शा लवकर मिळाली नाही .

तरी बरं थोडया अंतरावर मिळाली तर नाहीतर ऑफीसला उशीरच झाला असता . ( महिन्यातील चौथा उशीर म्हणजे एक दिवसाची रजाच गेली असती )

तरी बरं त्यामुळे आपण भरभर चालू शकतोय ह्याची जाणीव झाली .

म्हणजे आपल्याला हृदय विकारची भीती वाटते ती बहुतेक मानसिक असावी .

४ . आज पावसामुळे गाडया बंद होत्या . ऑफीसातच थांबावे लागले . वैताग आहे अगदी .

तरी बरं मुलांची काळजी नव्हती . मुले घरी आजी / आजोबांकडे मजेत होती . फोनही चालू होता . घरी व्यवस्थित बोलता आले . गाडया बंद आहेत हे वेळेवर कळल्यामुळे ऑफीसात थांबायचा निर्णय घेता आला . नाहीतर गाडीत तासनतास बसावे / उभे राहावे लागले असते तर काय खैर नव्हती .

५ . मुलगा जास्त अभ्यासच करत नाही नाहीतर त्याचा पहिला नंबर व मार्कात ५ % तरी वाढले असते . ( मुलाला ८५ % मिळालेले असतात व दुसर नंबर आलेला असतो . )

तरी बरं अभ्यासाबरोबर त्याला इतर विषयात पण गती आहे . क्रिकेट किती छान खेळतो . इतर मैदानी खेळातही मागे नसतो . हौसेने बाबांबरोबर पोहायला जातो . शास्त्रीय पुस्तके वाचणे व लहान लहान प्रयोग करून पाहण्याचे तर वेडच आहे . सर्व मित्रांचा लाडका आहे . मदत करण्याचा स्वभाव आहे . त्याउलट पहिला नंबर आलेला मुलगा अगदी माणूस घाणा आहे . खेळही आवडत नाही . अभ्यास एके अभ्यास . तब्बेतही बरी नसते .

( आयुष्याच्या परिक्षेत फक्त मार्कच महत्वाचे नसतात तर परिपूर्ण जीवन जगण्याची कला असणे / आत्मसात करणे गरजेचे असते . )

६ . मुलगा काय असून नसल्यासारखा . चांगला शिकवला , तर परदेशी जाऊन स्थाईक झालाय . त्यापेक्षा मुलगा नसताच तर चालले असते .

तरी बरं रोज तुम्हाला फोन करतो . वर्षातून १५ दिवस कुटूंबाबरोबर राहून जातो . पैसे पाठवितो . देखभाल करायला नोकर चाकर ठेवले आहेत . तुम्हाला सुद्धा परदेशात स्थायिक होण्यासाठी विनंती करतोय पण तुम्हीच जात नाही . तुमची तब्बेतही चांगली आहे . समजा तुमचा मुलगा शिकलाच नसता किंवा शिकून चांगली नोकरी लागली नसती तर तुमच्या डोक्यालाच जास्त ताप झाला असता . तुमचा मुलगा तुम्हाला विचारतच नसता तर गोष्ट वेगळी होती आणि हे निपुत्रिकाचे दुःख हे ज्याच्या वंशा जावे त्यालाच कळे .

७ . मधुमेहाचे निदान झालेय म्हणजे संपलेच सगळे .

तरी बरं मधुमेहच झालाय . माणूस काही लगेच मरत नाही . व्यवस्थित काळजी घेतली तर १० – १५ वर्षे काही मरण नाही . शेवटी आयुष्य हे एक दिवस संपणारच आहे .

तरी बरं औषधासाठी पैसा पुरेसा आहे. कुटूंबातील इतरांना काही फारसा त्रास होणार नाही. थोडे पथ्यपाणी सांभाळावे लागेल इतकेच. एखादा असाध्य रोग असता तर वर्षाचीच मुदत. उपचार व मरण दोन्ही वेदनामय. आयुष्यातील अर्धवट कामे वेळेवर उरकता येतील. शेवटी आपण स्वतःच मधुमेहाला कारणीभूत आहोत. तरूणपणी मनमानीची लागलेली सवय उतारवयातही साथ देतेय. व्यायाम नाही. दिवसाचे वेळापत्रक पाळणे कमीपणाचे वाटते. तोंडावर ताबा नाही. ( अगदी दोन्ही अर्थाने खाण्यासाठी आणि दुसऱ्याला दुखविण्यासाठी )

८. ह्या वर्षी बोनसही कमी मिळाला. वेतनवाढ मिळाली नाही. महागाई केवढी वाढतेय.
तरी बरं नोकरी अजून चालू आहे. ह्या स्पर्धेच्या युगात तुमच्या मालकाने वेगवेगळया उपाययोजना करून कंपनी चालू ठेवण्याचा प्रयत्न सोडला नाहीये. नाहीतर कंपनी काय कोणीही विकत घेईल. पण मग नोकरीची शाश्वती असेल का ? आज ही नोकरी सुटली तर आपल्याला मुळात नोकरी मिळेल का व मिळालीच तर पगार किती मिळेल याचा विचार केलाय का? आपले वयही उतरंडीला लागलेले. शिक्षण जास्त नाही. अनुभवाच्या जोरावरच तुम्हाला कंपनीत मान आहे. तो मान विनासायास लगेच दुसरीकडे मिळेल का ? आपण अजून खर्चिक सवयांना आळा का घातला नाही ? कंपनीची परिस्थिती , वाढती स्पर्धा हे गेले काही वर्ष आपण पहात आहोत. आपल्या मित्रांना घ्यावी लागलेली **VRS** खरेतर **CRS. ( Compulsory retirecment scheme )** आपण बघितलेली आहे.
काय राव , उगीच का समस्येचा बाऊ करताय ?

९. मुलाला बारावीला २ % टक्के कमी मिळाले. मेडिकलला प्रवेश मीळणार नाही. देणगी देण्याची ऐपत नाही.
तरी बरं मुलाला ९४ % मार्क मिळाले. ठीक आहे. डॉक्टर नाहीतर इंजिनिअरींगला प्रवेश मिळू शकेल. शेवटी हुशार मुलगा कोणत्याही क्षेत्रात आपला ठसा उमटवू शकतो. मुलगा फारसा हिरमुसला नाही ना ? तुम्हीच जास्त मनाला लावून घेतलाय.
( काय राव हल्लीच मटामधील श्री उज्वल निकमसाहेबांची मुलाखत वाचली की नाही ? त्यांना पण डॉक्टर व्हायचे होते म्हणून सायन्सला गेले. २ % कमी पडले म्हणून प्रवेश मिळाला नाही. मग बीएसी पूर्ण केले व वकील झाले. त्यांचे वडिल बॅरिस्टर होते. आज निकम साहेबांनी वकीली व्यवसायाला केवढी प्रतिष्ठा मिळवून दिलेय. )

मित्रांनो यादी कितीही लांब होऊ शकेल. पण समस्येकडे बघायची दृष्टी तुम्हाला कळली असेल तर मग माझा प्रयत्न यशस्वी झाला असे मी समजेन.
बघा प्रयत्न करून. नकारात्मक गोष्टीतील सकारात्मक बाजू शोधा. ( Search for + tive in - tive. )
Best of Luck.